असा. क्र. २९ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, मे १२, २००८/वैशाख २२, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्ती-वेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | २५८-२५९ |

दिनांक ११ मे २००८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १२ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९७७ चा महा. १.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक १ मे २००८ पासून अंमलात येईल.



[**किंमत** : १५.०० रुपये]

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— १९७७ चा महा. १.

(क) " आठ हजार रुपये " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पहिल्या परंतुकामध्ये, " पाचशे रुपये " या मजकुराऐवजी, " सातशे पन्नास रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४अ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " १ एप्रिल २००७ " या मजकुराऐवजी, " १ मे २००८ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " चार हजार रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२अ) मधील,—

(एक) " १ एप्रिल २००७ " या मजकुराऐवजी, " १ मे २००८" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " चार हजार रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२ब) मधील, " १ एप्रिल २००७ पासून दरमहा चार हजार रुपये " या मजकुराऐवजी, " १ मे २००८ पासून दरमहा पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४६

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, मे १२, २००८/ वैशाख २२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Legislature Members' Pension (Amendment) Act, 2008 (Mah. XXIV of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXIV OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 12th May 2008).*

An Act further to amend the Maharashtra Legislature Members' Pension Act, 1976.

Mah. I of 1977. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Legislature Members' Pension Act, 1976, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Legislature Members' Pension (Amendment) Act, 2008.

(2) It shall come into force with effect from the 1st May 2008.

Amendment of section 3 of Mah. I of 1977.

2. In section 3 of the Maharashtra Legislature Members' Pension Act, 1976 (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section *(1)*,— Mah. I of 1977.

*(a)* for the words "eight thousand rupees" the words "ten thousand rupees" shall be substituted;

*(b)* in the first proviso, for the words "five hundred rupees" the words "seven hundred fifty rupees" shall be substituted.

Amendment of section 4A of Mah. I of 1977.

3. In section 4A of the principal Act,—

*(a)* in sub-section *(2)*,—

*(i)* for the words, letters and figures "the 1st day of April 2007" the words, letters and figures "the 1st May 2008" shall be substituted ;

*(ii)* for the words "rupees four thousand" the words, "rupees five thousand" shall be substituted ;

*(b)* in sub-section *(2A)*,—

*(i)* for the words, letters and figures "the 1st day of April 2007" the words, letters and figures "the 1st May 2008" shall be substituted ;

*(ii)* for the words "rupees four thousand" the words "rupees five thousand" shall be substituted ;

*(c)* in sub-section *(2B)*, for the words, figures and letters "the 1st April 2007, at the rate of rupees four thousand per month" the words, figures and letters "the 1st May 2008, at the rate of rupees five thousand per month" shall be substituted.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई